आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर /वाशिममधून किसान सन्मान निधीचं वितरण, तर ठाण्यात ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचा करणार प्रारंभ

- महाराष्ट्रात अकृषिक कर पूर्णपणे माफ /जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी, मच्छीमार या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळं स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- छत्तीसगढमधे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत २८  माओवादी ठार

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८०९ अंकांची घसरण

**आणि**

- महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत भारताच्या पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा प्रतिस्पर्धी न्यूझीलंडचा निर्णय

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात उद्या सकाळी वाशिममध्ये कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित सुमारे २३ हजार कोटी रुपयांच्या विविध उपक्रमाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे. बंजारा वारसा संग्रहालयाचं उद्घाटनही ते करतील. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प ते राष्ट्राला समर्पित करतील. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यात एकूण १९ मेगावॅट

क्षमतेचे पाच सौर ऊर्जा पार्कचं प्रधानमंत्री उद्घाटन करणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांचाही सन्मान करतील.

त्यानंतर दुपारी ४ वाजता ठाण्यामध्ये ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. सुमारे १२ हजार २०० कोटी रुपयांच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाची आणि सुमारे ३ हजार ३१० कोटी रुपयांच्या छेडा नगर ते आनंद नगर या ईस्टर्न फ्रीवेच्या एलिव्हेटेड विस्ताराची पायाभरणीही ते करतील. तसंच सुमारे २ हजार ५५० कोटी रुपयांच्या नैना अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकासकामांच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी करतील. ठाणे महापालिकेच्या उच्चस्तरीय प्रशासकीय इमारतीची पायाभरणीही त्यांच्या हस्ते होणार आहे. ठाणे शहरात होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

उद्या संध्याकाळी ६ वाजता, बीकेसी ते आरे जेव्हीएलआरपर्यंत धावणाऱ्या मेट्रो ट्रेनला बीकेसी मेट्रो स्टेशनवरून प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यावेळी बीकेसी आणि सांताक्रूझ स्थानकांदरम्यान ते मेट्रोनं प्रवास करणार आहेत.

**<><><><>**

अकृषिक कर पूर्णपणे माफ करायला राज्य सरकारनं आज मंजुरी दिली. गावठाणाबाहेरची घरं, शहरी भागातल्या बहुमजली इमारती, वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनींना आता हा कर द्यावा लागणार नाही. राज्यातल्या जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी, मच्छीमार या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत ३ ऑक्टोबर हा दिवसात मराठी अभिजात भाषा गौरव दिवस म्हणून साजरा करायचा निर्णयही सरकारनं घेतला.

ऑलिम्पिक, राष्ट्रकूल, आशियाई, युवा ऑलिम्पिक, पॅरालम्पिक यासारख्या स्पर्धेतल्या पदक विजेत्यांना आणि त्यांच्या प्रशिक्षकांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराच्या रकमेतही सरकारनं वाढ केली. या स्पर्धांमधल्या सुवर्ण पदक विजेत्यांना आता ५ कोटी रुपयांपर्यंतची रक्कम मिळेल.

रमाई आवास, शबरी आवास योजनेतल्या घरकुलांच्या अनुदानात वाढ होणार आहे. राज्यातले सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार आणि मुकादमांना झोपडी तसंच बैल जोडी करिता विमा संरक्षण मिळेल. प्राचीन आणि ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान करणाऱ्यांना आता २ वर्षांचा तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड होईल.
राज्यातील लहान जलविद्युत प्रकल्प आणि त्याच्यासोबतचे सौर ऊर्जा प्रकल्प खाजगीकरणातून बांधा, वापरा, हस्तांतरित करा तत्वावर विकसित केले जाणार आहेत.

<><><><>

महत्वाच्या संसाधनांची मक्तेदारी आणि शस्त्रीकरण जगाच्या हिताच्या दृष्टीनं योग्य नसल्याचा इशारा संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी दिला आहे. ते आज नवी दिल्ली इथं भारत-प्रशांत क्षेत्रीय संवादात बोलत होते. दुर्मिळ खनिजासारखी महत्वाची संसाधनं आणि डेटा स्टोरेज सगळ्यांना समानरित्या उपलब्ध असलं पाहिजे आणि त्यामधून होणार जागतिक संघर्ष रोखले पाहिजे, असं ते म्हणाले. शाश्वत विकास, आर्थिक वाढ आणि परस्पर सुरक्षा यांना प्राधान्य देणारी भागीदारी आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. हरयाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी  १ हजार ३१ उमेदवार रिंगणात आहे.  उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यासाठी २० हजार ६३२

मतदान केंद्र तयार केली आहेत. मतदान सुरळीत व्हावं यासाठी सर्व मतदान केंद्रांवर चोख सुरक्षा व्यवस्था केली आहे.

<><><>

छत्तीसगढच्या नारायणपूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत किमान २८ माओवादी ठार झाले. नारायणपूर जिल्ह्याच्या आबुजहमद परिसरात आज दुपारी ही चकमक झाली. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्याच्या पोलिसांची संयुक्त टीम नक्षलविरोधी शोध मोहिमेवर असताना ही चकमक घडली. गोवेल,नेंदुर आणि थुलथूली भागांत हे शोधकार्य झाले. घटना स्थळावरून माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत. तसंच घटनास्थळी सापडलेल्या शस्त्राचा साठाही यावेळी जप्त करण्यात आला. शोधकार्य अजूनही चालू आहे.

<><><>

गेल्या काही दिवसांपासून शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आजही कायम राहिली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ८०९ अंकांनी घसरुन ८१ हजार ६८८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २३६ अंकांची घसरण नोंदवून २५ हजार १५ अंकांवर बंद झाला.

<><><>

महिलांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताचा पहिला सामना सुरू झाला असून. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या ९ व्या षटकात २ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

दरम्यान, आजच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडीजवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणासाठी उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडीजच्या संघाला निर्धारित २० षटकांमध्ये ६

गड्यांच्या मोबदल्यात ११८ धावांवर रोखलं. त्यानंतर ११९ धावांचं लक्ष्य एकही गडी न गमावता १३ चेंडू राखून सहज पूर्ण केलं.

**<><><><>**

पेरूमध्ये सुरू असलेल्या आयएसएसएफ ज्युनिअर नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या मुकेश नेलावल्ली, राजवर्धन पाटील, आणि हरसिमर सिंह रथ्था या तिघांच्या चमूने पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तुल या सांघिक स्पर्धेत विजय मिळवला आहे. हे भारताचे या स्पर्धेतले ११ वे सुवर्ण पदक आहे. याशिवाय १ रौप्य आणि ४ कांस्य पदके मिळवून भारत या स्पर्धेत एकूण १६ पदकांनिशी आघाडीवर आहे. तर ३ सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवून चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><>**

कोणत्याही परिस्थितीत रेल्वेचं खासगीकरण होणार नाही, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. ते आज नाशिकमध्ये रेल्वे सुरक्षा बलाच्या चाळिसाव्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात संचलनाचं निरीक्षण केल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. रेल्वे सुरक्षा बलाच्या विभागीय प्रशिक्षण केंद्रांसाठी ३५ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही वैष्णव यांनी केली. याशिवाय रेल्वे सुरक्षा बलाच्या तमिळनाडू इथल्या श्वानपथक विभागीय प्रशिक्षण केंद्रासाठी साडेपाच कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही त्यांनी मंजूर केला. अश्विनी वैष्णव यांनी या कार्यक्रमात रेल्वे सुरक्षा बलाच्या ३३ कर्मचाऱ्यांना विशेष सेवा पदकं आणि जीवन रक्षा पदकंही प्रदान केली.

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेलमार्गात नारायणपूर इथं २३ देशांनी उभारलेल्या दुर्बिण क्षेत्राचा अडथळा येत असून त्यासाठी पर्यायी मार्ग शोधण्याचं काम सुरू असल्याची ग्वाही वैष्णव यांनी दिली. नाशिक, लासलगाव आणि नांदगावसह १३२ रेल्वेस्थानकांचं पुनर्निर्माण होत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

महाराष्ट्रातली बौद्ध धर्माशी संबंधित तीर्थस्थळं आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित स्थळं तसंच स्मारकं यांचा विकास करण्यात येणार असल्याचं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. नागपूरमधे पवित्र दीक्षाभूमीचं दर्शन घेतल्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. या कामासाठी संबंधित सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था या सर्वांसोबत समन्वय साधण्यात येणार असल्याचं ते म्हणाले. किरेन रिजीजू आज प्रदेश भाजपा कार्यालयातर्फे आयोजित बैठकीत सहभागी होणार असून, अनुसूचित जाती मोर्चाच्या एका बैठकीला संबोधित करणार आहेत.

**//<><><><>//**